महाराष्ट्र शासन

क्र. जशिअ -२०१७/प्र.क्र.४१५/जल-७,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१७.

प्रति,
**विभागीय आयुक्त (सर्व)**
**जिल्हाधिकारी (सर्व)**

विषय :- जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरिता अंमलबजावणीकरिता सूचना.
संदर्भ :- क्र.जशिअ २०१७/प्र.क्र.४१५/जल-७, दि. ४/८/२०१७.

जलयुक्त शिवार अभियानाची प्रभावी पणे अंमलबजावणी करण्याकरिता क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण विभागस्तरावर घेण्यात आले आहे. क्षेत्रीय स्तरावरुन उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

१) शासन पत्र क्रमांक : जशिअ २०१७/प्र.क्र.३७१/जल-७, दि. १३ जुलै, २०१७ नुसार सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडण्यात आलेल्या गावांचे कामकाजाचे नियोजन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. तथापि सन २०१७-१८ या वर्षातील गाव निवडण्याची प्रक्रीया ही यापूर्वीच झालेली असल्यामुळे व जिल्हयामध्ये शिवार फेरी, ग्राम सभेची मान्यता, तालुका स्तरीय समितीची मान्यता व जिल्हास्तरीय समितीची मान्यता आराखडयात घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ज्या गावामध्ये ही प्रक्रीया पूर्ण झालेली आहे अशा गावांमध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

..२..

i. कृषि आयुक्तालय जावक क्र : मृदसं/जशिअ/मृद-२/१४०३, दि. २/८/२०१७ अन्वये संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांनी गाव पाणलोट विकास आराखडयानुसार पाण्याच्या ताळेबंदाबाबत (Water budget) सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच कृषि आयुक्त जावक क्र. मृदसं/जशिअ/मृद-२/१४४४, दि. ३/८/२०१७ अन्वये संचालक, मृदसंधारण, पुणे यानी उपचार क्षमता नकाशा (Treatment Potential Map) पाणी वापरण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. वरील सूचनेनुसार पाण्याचा ताळेबंद करण्यात यावा.

ii. शासन पत्र क्रमांक : जल-७/२०१७, दि. २३ मे, २०१७ नुसार मातीची होणारी धुप थांबविणे व नाल्यामध्ये गाळ जमा होऊ नये याकरिता गाव आराखडयातील क्षेत्र उपचाराची कामे (Area Treatment) ची कामे ७०% पूर्ण झाल्यानंतर सिमेंट नाला बांधाची कामे हाती घेण्याबाबत कळविले आहे. तसेच शासन पत्र क्र. जशिअ २०१७/प्र.क्र.३२२/जल-७, दि. २९ जून, २०१७ नुसार जलयुक्त शिवार अभियानानुसार सन २०१७-१८ या वर्षी निवडलेल्या गावामधील कृती आराखडा करताना कामांचा प्राधान्यक्रम प्राधम्यक्रम ठरविण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

iii. वरील (i) व (ii) मधील याचा विचार करुन आराखडयामध्ये आवश्यक ते बदल (Addition/Deletion) जिल्हास्तरीय समितीने गाव आराखडा अंतिम करताना करण्यात यावे व गावाच्या समग्र आराखडयाला (Net Planning) मान्यता घेण्यात यावी. ही कार्यवाही करीत असताना एकाच वेळी (Simultaneously) तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणे या सर्व बाबी तात्काळ पूर्ण करण्यात याव्या व कोणत्याही परिस्थितीत सन २०१७-१८ मधील जलयुक्त शिवार अभियानाचे काम दि. ३० ऑक्टोबर, २०१७ पूर्वी सुरु करण्यात येईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

२. शासन पत्र क्र : जल-७/२०१७, दि. २३ मे, २०१७ अन्वये मातीची होणारी धूप थांबविणे व नाल्यामध्ये गाळ जमा होऊ नये याकरिता गाव आराखडयातील क्षेत्र उपचाराची कामे (Area Treatment) ची कामे ७० टक्के पूर्ण झाल्यानंतर सिमेंट नाला बांधचे कामे हाती घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि याबाबत स्पष्ट करण्यात येते की, क्षेत्र उपचाराची ७० टक्के कामे ही पावसाळयापूर्वी पूर्ण होत असल्याची खात्री

३

जिल्हा समितीला पटल्यास सिमेंट नाला बांधाची कामे एकाच वेळेस इतर कामांसोबत सुरु करण्यास हरकत नाही.

३. शासन पत्र क्र :जशिअ २०१७/प्र.क्र.३२२/जल-7, दि. २९ जून, २०१७ नुसार जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षी निवडलेल्या गावामधील कृती आराखडा करताना कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आलेला आहे. त्यानुसार नाला उपचाराची कामे (सिमेंट नाला बांध व को.प.बंधारा) कमाल मर्यादा ३० टक्केपेक्षा अधिक खर्च होणार नाही याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि याबाबत स्पष्ट करण्यात येते की, अपूर्ण कामे पूर्ण करणे, दुरुस्तीची कामे, क्षेत्र उपचारांची कामे, लोकसहभागातून होणारी कामे व ३० टक्केपर्यंत सिमेंट नाला बांधाची कामे घेऊनसुध्दा गाव जलपरिपूर्ण (Water Natural) होत नसल्यास गाव जलपरिपूर्ण होण्याकरिता नाला उपचाराच्या कामाची ३० टक्के मर्यादा त्या गावापुरती शिथील करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीला देण्यात येत आहेत.

४. शासन निर्णय नियोजन विभाग क्र. डीएपी २०१५/प्र.क्र.२३/ का.१४८१, दि. ११ मार्च, २०१५ नुसार नियोजन विभाग, दुरुस्तीच्या कामकरिता ज्या बाबी दिलेल्या आहेत,जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त होणाऱ्या निधीकरीता लागू असून त्या बाबी जलसंधारण विभागाकडून देण्यात आलेल्या विशेष निधी (Fund Gap) करिता लागू राहणार नाहीत.

५. जलसंपदा विभाग किंवा शासकीय मालकीचे जेसीबी /पोकलेन यांचेद्वारे लोकसहभागामधून कामे केली जातात. अशा मशिनचे एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर स्थलांतरीत करताना लागणारा खर्च उप पादेशिक परिवहन अधिकारी यांनी निश्चित केलेल्या दरानुसार अनुज्ञेय राहील.

वरील बाबी व्यतिरिक्त आणखी काही स्पष्टीकरण आवश्यक असल्यास त्याबाबत तात्काळ संदर्भ करावा. जेणेरुन विभागीय स्तरावर ज्याप्रमाणे प्रशिक्षण घेण्यात आले अशाच प्रकारे जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतल्यास ग्रामस्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचे कामकाज सुलभ होईल.

११/९

( एकनाथ डवले )
सचिव (जलसंधारण व रोहयो)